| | |
|---|---|
| MHKO160009562025 | संक्षिप्त फौजदारी खटला क्रं.५०२/२०२५<br>निशाणी क्रमांक /ब |

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (१९७४ चा अधिनियम दोन )प्रकरण वीस अन्वये संक्षिप्त संपरीक्षा केलेला २०२५ चा अविलंबीत खटला अनु.क्रं.५०२ चा अभिलेख
**(श्रीमती एस.डी. बागल,प्र. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मलकापूर-शाहुवाडी यांचे न्यायालय)**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपराध घडल्याचा दिनांक | - | १४/०९/२०२५ |
| २ | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | - | १४/०९/२०२५ |
| ३ | फिर्यादीचे नाव, त्याच्या आईबापाचे नाव, वय व त्याचे निवासस्थान | - | एन.व्ही. पाटील, पो.हे.कॉ. ६७१ पन्हाळा पोलीस ठाणे |
| ४ | आरोपीचे, आरोपीच्या आई व बापाचे नाव, वय व निवासस्थान | - | अनेब दिपक मजुमदार, व.व.२९, रा. बेनेद्रीया जग्राम, पश्चिम बंगाल |
| ५ | (ज्याबददल फिर्याद दिली आणि जो अपराघ आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील | - | आरोपाचा आशय... |

तुम्ही दिनांक १४/०९/२०२५ रोजी १३.४५ वाजणेचे सुमारास मानोली डॅम जाणारे रोडवर, ता.शाहुवाडी, जि. कोल्हापुर गावचे हद्दीत सार्वजनिक ठिकाणी रोडवर गैरशिस्त वर्तन करून सार्वजनिक सार्वजनिक शांततेचा भंग करीत असताना मिळून आलेने आणि त्याद्वारे तुम्ही महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११२ आणि कलम ११७ खाली शिक्षापात्र असा या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा अपराध केला आहे.

(ब) कलम व अधिनियम - महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११२/११७ अन्वये.
(क) मालमत्तेचे मुल्य - ----

आरोपीचे प्रतिकथन -

प्रश्न १ – तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर - होय.
प्रश्न २ – आता तुमचेवर ठेवणेत आलेला चार्ज तुम्हाला मराठीतून वाचून दाखविला व समजावून सांगितला तो समजला काय ?
उत्तर - होय.
प्रश्न ३ - तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर - मला गुन्हा कबूल आहे.

.................
आरोपीची सही
दिनांक -१३/०५/२०२६
स्थळ-शाहूवाडी

समोर,

**( एस.डी. बागल )**
**प्र. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
मलकापूर-शाहुवाडी

## न्यायनिर्णय

६. वर नमूद आरोपीविरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११२/११७ अन्वये केस दाखल केली आहे. आरोपीस त्याचेविरुध्द असलेला दोषारोप वाचून दाखविला. तो दोषारोप आरोपीने स्वच्छेने मान्य व कबूल केला आहे. शिक्षेविषयी आरोपीचे म्हणणे असे की, सदरचा गुन्हा त्याच्या हातून प्रथमच घडला आहे, तरी कमीत कमी दंड करावा अशी विनंती केली आहे.

७. याउलट सरकारी वकिलांनी आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

८. गुन्हयाचे स्वरूप आणि आरोपी यांचे म्हणणे यांचा विचार केला असता आरोपी यांना दंड रकमेवरती खुले करणे ही योग्य शिक्षा आहे असे माझे मत आहे, त्यास अनुसरून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपीस महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११२/११७ या गुन्हयासाठी दोषी ठरवून रक्कम रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे मात्र) दंड व दंड न भरलेस २ दिवस साधी कैद अशी शिक्षा फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५२ प्रमाणे सुनावण्यात येत आहे.

२. प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत आरोपीस मोफत देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by Shraddha Dinkar Bagal

दिनांक -१३/०५/२०२६
स्थळ-शाहूवाडी

**( एस.डी. बागल )**
**प्र. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**मलकापूर-शाहुवाडी**